cjp.org.in

# जनगणना विरुद्ध एनपीआर

**सरकारी अधिकारी तुमच्या घरी येतील तेव्हा काय कराल**

भारत सरकारने, एप्रिल २०२० ते सप्टेंबर २०२० पर्यंत भारतातील सामान्य रहिवासी निश्चित करण्यासाठी घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले जाणार असल्याचे अचानक जाहीर केले (राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी-एनपीआर). २०२१ मध्ये भारतात दर दहा वर्षांनी केली जाणारी जनगणना देखील होणे अपेक्षित आहे. एक अत्यंत आवश्यक आणि नियमित प्रक्रिया म्हणजे जनगणना, आणि दुसरी एनपीआर-एनआरसीची विवादास्पद प्रक्रिया, अशा या दोन प्रक्रियांना एकत्र करून, सरकार मुद्दाम गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण करीत आहे. नागरिक म्हणून आपण या दोन्ही प्रक्रियांचा कायदेशीर आधार समजून घेतला पाहिजे आणि आवश्यक व कायद्याने बंधनकारक असलेल्या प्रक्रियेत (जनगणना) भाग घेताना तशाप्रकारे संवाद साधला पाहिजे आणि दुसऱ्या म्हणजे एनपीआर प्रक्रियेवर बहिष्कार टाकला पाहिजे कारण एनपीआरमध्ये विचारले जाणारे प्रश्न एका साध्या लोकसंख्या नोंदणीच्या आवश्यकतेच्या पलिकडचे आहेत.

**आसामची एनआरसी:** एनआरसी बाबत आसामचा अनुभव भयंकर आहे, ज्यामध्ये अंतिम एनआरसीमधून १९ लाख लोकांना वगळण्यात आले आहे. सरकारने या प्रक्रियेची अंमलबजावणी करण्यासाठी ६ वर्षांत १२२० कोटी रुपयांचा खर्च केला तसेच ५२,००० सरकारी कर्मचाऱ्यांची सेवा वापरली. सुरुवातीला (डिसेंबर २०१७) आसामच्या ३.२ कोटी लोकसंख्येपैकी १.२ कोटी, आणि नंतर (जुलै २०१८) ४४ लाख आणि अखेरीस १९ लाख लोक वगळले गेले. या प्रक्रियेसाठी आसामच्या लोकांना २४,४०० कोटी रुपयांहून अधिक खर्च करावा लागला. वगळल्या गेलेल्या १९ लाख लोकांचे भवितव्य आजही अधांतरीच आहे. त्यांना आता दीर्घकाळ न्यायालयीन लढाई लढावी लागणार आहे; परदेशी नागरिक न्यायाधिकरणांपासून ते उच्च न्यायालय ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत. यादी जाहीर होऊन साडेचार महिने उलटून गेले तरीही या दुर्दैवी लोकांना त्यांना यादीतून का वगळण्यात आले याचे कोणतेही कारण सांगण्यात आलेले नाही! सरकारने राज्यात पून्हा एकदा एनआरसी प्रक्रियेचा इशारा दिलेला आहे. सिटीझन्स फॉर जस्टीस अँड पीस (cjp.org.in) जवळपास तीन वर्षे मैदानात उतरून काम करत आहे आणि आमच्या टीमने १२ लाखांहून अधिक लोकांना मदत केली आहे. ६ जानेवारी रोजी, आम्ही सर्वोच्च न्यायालयाकडून एक अंतरिम आदेश प्राप्त केला ज्यामध्ये असे निर्देश देण्यात आले की, कोणत्याही मुलांना एकतर आई-वडिलांपासून वेगळे केले जाणार नाही किंवा आसामच्या भयावह अशा अटक छावण्यांमध्ये पाठवले जाणार नाही.

जे २१ प्रश्न सरकार आता **नवीन एनपीआर-२०२० च्या अंतर्गत विचारत आहे त्यांच्यामुळे आपल्या गोपनीयतेस धोका निर्माण झाला आहे, यामुळे पाळत ठेवली जाऊ शकते आणि सर्वांत धोकादायक गोष्ट म्हणजे नागरिकत्वाच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवले जाण्यासाठी लोकसंख्येच्या काही घटकांना लक्ष्य करण्यासाठी ते मदत करू शकतात.** एनसीआर-एनआरसी आणि जनगणना या दोन्ही प्रक्रिया एकत्र करून सरकार लबाडी आणि अप्रामाणिकपणा करत आहे. राज्य सरकारे दोन्ही सर्वेक्षणे एकाच वेळी करण्यासाठी समान अधिकारी नेमण्याची शक्यता आहे. म्हणूनच, आपण *या दोन्ही गोष्टी स्पष्टपणे समजून घेणे आणि त्यांच्यामधील फरक ओळखणे आवश्यक आहे.*

- आपण कोणत्या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत?
- कोणत्या प्रश्नांची उत्तरे देण्यास आपण नकार दिला पाहिजे का?
- का?

पहिली गोष्ट म्हणजे, एनपीआर प्रक्रिया नागरिकत्व कायदा १९५५ (नागरिकत्व दुरुस्ती कायदा २०१९) नुसार राबवण्यात येत आहे, तर जनगणना कायदा १९४८ नुसार जनगणना करण्यात येत आहे.

### आपण जनगणनेसाठी तयार आहोत जशी ती २०११ मध्येही घेण्यात आली होती. आपला विरोध एनपीआर-एनआरसीला आहे!

**जनगणना आणि एनपीआर मधील फरक आणि साम्यता**

| जनगणना | एनपीआर |
|---|---|
| जनगणनेचे प्रश्न अनिवार्य असतात आणि त्यांचे उत्तर द्यायलाच पाहिजे | एनपीआरचे प्रश्न ऐच्छिक आहेत. **तुम्ही त्यांना उत्तर न देण्याचा पर्याय निवडू शकता.** |
| जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात विचारले गेलेले प्रश्न 'घराच्या यादीच्या गणती'शी संबंधित असतात जे घरात असलेल्या स्वच्छतागृहे, वीज, पाणीपुरवठा इत्यादी सुविधांशी संबंधित असतात. | एनपीआरमधील प्रश्न म्हणजे जनगणना घरांची माहिती अनुसूचीतील (दुसऱ्या टप्प्यातील) एक भाग आहे, ज्याची अंमलबजावणी २०२१ मध्ये होणार आहे; त्यापैकी पालकांचे जन्म स्थान आणि पालकांची जन्म तारीख असे प्रश्न सोडून जे यापूर्वी देखील कधी एनपीआर प्रक्रियेचा भाग नव्हते |
| जनगणना दर १० वर्षांनी नियमितपणे केली जाते. १८७२ पासूनची ही सोळावी आणि भारताच्या स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना आहे | पहिली एनपीआर २०१० मध्ये झाली, ती २०१५ मध्ये सुधारित करण्यात आली. एनपीआर दर दहा वर्षांनी अद्ययावत केली जात असल्याचा दावा सरकारने केला आहे. एनपीआर याद्या बनवणे किंवा माहिती संकलन नियमित कालावधीने केले जावे असे नियमांमध्ये म्हटले नाही. म्हणूनच, एनपीआरमागील हेतूकडे सगळे संशयास्पदरीतीने पाहत आहेत |
| जनगणना ही जनगणना कायदा १९४८ मधील तरतुदींनुसार केली जाते | एनपीआरला पूर्ण कायदेशीर मान्यता नाही. एनपीआर नागरिकत्व (नागरिक नोंदणी आणि राष्ट्रीय ओळखपत्रे जारी करणे) नियम, २००३ अंतर्गत राबविण्यात येत आहे, हा एक दुय्यम कायदा आहे. नियम कार्यकारिणी / सरकारद्वारे बनवले जातात आणि संसदेद्वारे त्यांची छाननी केली जात नाही |
| घर यादी गणनेत प्रश्नांची स्वतंत्रपणे उत्तरे देणे आवश्यक आहे, उत्तरांचे रकाने रिक्त असतील | एनपीआर अनुसूचीमध्ये बहुतेक उत्तरांचे रकाने आधीच भरलेले असतील कारण हा एनपीआर अद्ययावत करण्याचा कार्यक्रम आहे. **ही माहिती तुम्ही सत्यापित करू शकता किंवा सत्यापित करण्यास नकार देऊ शकता.** |
| जनगणना प्रक्रिया एनआरसीशी संबंधित नाही | एनपीआर हे एनआरसीच्या निर्मितीच्या दिशेने पहिले पाऊल आहे. हे केवळ २००३ च्या नियमातच नमूद केलेले नाही तर हे शासनाने देखील संसदेत आणि गृहमंत्रालयाच्या २०१८-१९च्या वार्षिक अहवालामध्ये मान्य केले आहे. |
| जनगणने दरम्यान, जनगणना अधिनियम १९४८ च्या कलम ८ अन्वये अचूक माहिती देणे अनिवार्य आहे, ज्यामध्ये असे नमूद केले आहे की ज्या प्रत्येक व्यक्तीला (जनगणनेच्या उद्देशाने अधिकृत राजपत्रात प्रकाशित केला गेला आहे) असा कोणताही प्रश्न विचारला जाईल ती व्यक्ती त्या प्रश्नाचे तिच्या ज्ञानानुसार योग्य ते उत्तर देण्यास कायद्याने बांधील असेल. | एनपीआरमधील प्रश्नांची उत्तरे देणे एखाद्या व्यक्तीस कायद्याने बंधनकारक नाही. मात्र, नियम ९ आणि ७ नुसार प्रत्येकाला नोंदणी करावी लागेल आणि कुटुंब प्रमुखाने एनपीआर प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत अन्यथा त्याला रु. १०००/ - दंड होईल. म्हणजेच उत्तरे न देणे हे ऐच्छिक आहे परंतु तुम्ही उत्तर न दिल्यास सरकार तुम्हाला संशयास्पद नागरिक (डीसी) म्हणून घोषित करेल किंवा करू शकेल. * |

| | |
|---|---|
| जनगणना हा प्रशासकीय हेतूंसाठी आणि आर्थिक आणि सामाजिक संशोधन व नियोजनाच्या अनेक बाबी तसेच सरकारच्या धोरण आखण्याच्या (कल्याणकारी योजना इ.) अनेक पैलूंसाठी आवश्यक असलेल्या राष्ट्रीय लोकसंख्येच्या माहितीचा प्राथमिक स्रोत आहे. | एनपीआर ही एक राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी आहे ज्यात देशातील सर्व 'सामान्य रहिवाशां'चा तपशील असेल जरी ते भारताचे नागरिक असोत किंवा नसोत. अखिल भारतीय एनआरसीसाठी डेटाबेस तयार करण्यासाठी एनपीआर प्रक्रिया राबवली जात आहे |
| जनगणनेची माहिती भारतात दोन टप्प्यात गोळा केली जाते. पहिला टप्पा घरांची यादी करण्याचा असतो तर त्यानंतरचा दुसरा टप्पा घरगुती माहितीचे संकलन करण्याचा असतो. | एनपीआर हा एनआरसीचा पहिला टप्पा मानला जाऊ शकतो, एक अशी जी प्रक्रिया अखिल भारतीय एनआरसीच्या आधीची आहे |
| एनपीआर प्रक्रिया घरांच्या यादीची गणना किंवा २०२१च्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासोबत एकाच वेळी राबवली जात आहे. या दोन्ही प्रक्रिया १ एप्रिल २०२० रोजी सुरू होणार आहेत आणि ३० सप्टेंबर २०२० रोजी संपणार आहेत. (स्रोत: एनपीआरशी संबंधित गृह मंत्रालय-एमएचए-द्वारा जारी केलेली सूचना पुस्तिका) | |

सूचना पुस्तिकेत असेही म्हटले आहे की गणती प्रक्रिया **एकाच वेळी** केली जाईल त्यामुळे बहुधा अशी शक्यता आहे की जेव्हा जनगणनेचा गणक तुमच्या दारावर येईल तेव्हा **तो एनपीआर आणि जनगणनेच्या अनुसूची एकत्रितपणे भरेल!** जरी जनगणनेची आकडेवारी सरकारच्या धोरण बनवण्यासाठी, कल्याणकारी योजनांसाठी आणि देशाच्या सामान्य विकास आणि वाढीसाठी महत्त्वपूर्ण आहे आणि तिची उत्तरे देणे अनिवार्य असले तरी एनपीआरमागील कारण मात्र सरकारने स्पष्ट केलेलेच नाही. खरं तर, सरकारकडून पारदर्शकतेच्या आणि स्पष्टतेच्या अभावामुळेच *आपण एनपीआर-एनआरसीशी संबंधित असलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार देणे गरजेचे आहे.*

यापूर्वी केल्या गेलेल्या एनपीआर प्रक्रियेमध्ये लोकांच्या बायोमेट्रिक डेटाचे संकलन केले होते जो नंतर आधार डेटाबेसमध्ये समाविष्ट केला गेला. तथापि, २००३ च्या नियमात असे कोठेही नमूद केलेले नाही की एनपीआर प्रक्रिया नियमित कालावधीने किंवा दर दहा वर्षांनी केली जाते, केली जाईल.

म्हणूनच, जनगणना गणनाकर्ते संशयास्पद आणि कुटिल पद्धतीने एनपीआर कशी राबवतील हे आपल्यातील प्रत्येकाने समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे कोणते प्रश्न आहेत ज्यांचे तुम्ही उत्तर दिलेच पाहिजे आणि कोणत्या प्रश्नांचे उत्तर दिले नाही पाहिजे.

**एनपीआरमध्ये भाग घेणे ऐच्छिक आहे, तुम्ही उत्तर देण्यास नकार देऊ शकता!**

गृह मंत्रालय आणि केंद्र सरकारला लोकांच्या आणि एनपीआर-जनगणनेबाबत नुकत्याच झालेल्या बैठकीत स्पष्टपणे व्यक्त केल्यानुसार गैर-भाजपा सरकारांचा अशा दोन्हींच्या तीव्र विरोधाचा सामना करावा लागला आहे. हे आक्षेप *एनपीआर-एनआरसीमध्ये समाविष्ट असलेल्या चार विशिष्ट प्रश्नांशी संबंधित* आहेत ज्यापैकी खासकरून पालकांचे जन्मस्थान आणि जन्मतारीख याविषयीचे प्रश्न. कोंडीत सापडल्यामुळे गृहमंत्रालयाला अखेर सत्य मान्य करावे लागले ते म्हणजे एनपीआर मधील प्रश्नांची उत्तरे देणे पूर्णपणे ऐच्छिक आहे.

**सुचना:** उत्तरे देताना, जनगणनेतील घराच्या यादीशी संबंधित प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत मात्र एनपीआरमधील प्रश्नांची उत्तरे देण्याची गरज नाही! ही माहिती पुरवायची की नाही हे सर्वस्वी त्या व्यक्तीवर अवलंबून आहे. जरी, एनपीआर अनुसूचीमधील डेटाचे बरेच संच आधीच-भरलेले असले, तरी **तुम्ही ते सत्यापित करू शकता किंवा ते सत्यापित न करण्याचा पर्याय निवडू शकता.** * खालील तक्त्यामध्ये सावधगिरीची नोंद वाचा.

**जनगणना, तिचे महत्त्व आणि कायदेशीर आधार**

जनगणना हा प्रशासकीय हेतूंसाठी आणि आर्थिक आणि सामाजिक संशोधन व नियोजनाच्या अनेक पैलूंसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत राष्ट्रीय लोकसंख्येच्या माहितीचा प्राथमिक स्रोत आहे. मतदारसंघांची रचनाच केवळ जनगणनेच्या आधारे केली जात नाही तर राष्ट्रीय, स्थानिक, शहरी आणि ग्रामीण उत्पन्नाचे अंदाज तसेच आपल्या लोकांना कोणत्या स्तरापर्यंत सेवा आणि सुविधा उपलब्ध आहेत याबाबतचे महत्त्वपूर्ण पैलू देखील या आकडेवारीचे प्रामाणिकपणे समाकलन करून निश्चित केले जाऊ शकतात. म्हणजेच, ही आकडेवारी महत्त्वपूर्ण आहे जेणेकरुन लोकसंख्येच्या आकडेवारीला म्हणजेच लोकांच्या गरजांना अनुसरून सरकारे धोरणे आणि कल्याणकारी योजना तयार करु शकतील. लोकसंख्याशास्त्र (लोकसंख्येची वैशिष्ट्ये), आर्थिक घडामोडी, साक्षरता आणि शिक्षण, गृहनिर्माण व घरगुती सुविधा, शहरीकरण, जन्म व मृत्यु दर, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, भाषा, धर्म, स्थलांतर, अपंगत्व आणि इतर अनेक सामाजिक-सांस्कृतिक आणि लोकसंख्याशास्त्रीय माहितीसाठी जनगणनेची आकडेवारी हाच माहितीचा सर्वात विश्वासार्ह स्रोत आहे.

जनगणना कायद्याच्या कलम ४अ प्रमाणे, केंद्र सरकारने लेखी सूचना केल्यानुसार जनगणना करण्याच्या संदर्भातील कोणतीही कर्तव्ये पार पाडण्याच्या उद्देशाने कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास त्यांच्याकडे नोकरीवर असलेले कर्मचारी उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

**दोन टप्प्यांत जनगणना**

जनगणनेची माहिती भारतात दोन टप्प्यात गोळा केली जाते. पहिला टप्पा घरांची यादी करण्याचा असतो तर त्यानंतरचा दुसरा टप्पा घरगुती माहितीचे संकलन करण्याचा असतो. पहिल्या टप्प्यात घरांची माहिती गोळा केली जाते जसे की घरात असलेल्या स्वच्छतागृहे, वीज, पाणीपुरवठा इत्यादी सुविधा. दुसरा टप्पा घरातील सदस्यांबद्दलचा असतो. या आकडेवारीवरून घरातील लोकांची संख्या आणि म्हणूनच देशाची लोकसंख्या तर निश्चित होतेच शिवाय ही आकडेवारी लोकांची मातृभाषा, त्यांचा धर्म, ते आरक्षित प्रवर्गातील आहेत का, त्यांचे शिक्षण किती झाले आहे, ते अपंग आहे का इत्यादी माहितीचे भांडार बनते. अल्पसंख्याक जनता किंवा अपंगांसाठी कल्याणकारी धोरणे राबवण्याच्या उद्देशाने ही सर्व आकडेवारी आदर्शपणे वापरली जाते. या गोळा केलेल्या आकडेवारीचे धोरण निर्मितीच्या दृष्टीकोनातून असलेले महत्त्व पाहता, गेल्या काही वर्षांमध्ये जनगणनेच्या प्रश्नावलीमध्ये अगदी किरकोळ बदल केले गेले आहेत.

**एनपीआर**

एनपीआर ही एक राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी आहे ज्यात देशातील सर्व 'सामान्य रहिवाशां'चा तपशील असेल जरी ते भारताचे नागरिक असोत किंवा नसोत. एनपीआर अंतर्गत देशातील ११९ कोटी सामान्य रहिवाशांचा इलेक्ट्रॉनिक डेटाबेस यापूर्वीच २०१० मध्ये, घरांची जनगणना २०१० साठीच्या घरांच्या यादी सोबत बनवण्यात आला आहे. भारत सरकारने असेही सांगितले आहे की, एक व्यापक रहिवासी डेटाबेस तयार करण्यासाठी सर्व राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये (आसाम आणि मेघालय वगळता) २०१५-१६ दरम्यान एनपीआर डेटाबेस अद्ययावत केला आहे.

**एनपीआर कायदा आहे का?**

नागरिकत्व नियम, २००३ च्या तरतुदींनुसार एनपीआर राबवण्यात येत आहे. ती एका दुय्यम किंवा प्रत्यायुक्त कायद्याचा भाग आहे जो कार्यकारिणीस कायद्याच्या चांगल्या अंमलबजावणीसाठी नियम व अटी बनवण्याची परवानगी देतो. जर एनपीआर खरोखरच जनगणनेला दुय्यम असती तर तिचा समावेश नागरिकत्व नियमांऐवजी जनगणना नियमांतर्गत केला गेला असता.

जनगणना २०२१ अंतर्गत विचारले जाणारे प्रश्न ज्यांची तुम्ही उत्तरे देणे आवश्यक आहे आणि असे प्रश्न जे एनपीआर २०२० द्वारा जाणूनबुजून आणले जात आहेत ज्यांची तुम्ही उत्तरे देण्याची गरज नाही, त्या प्रश्नांविषयी हे एक मार्गदर्शक आहे. जनगणनेच्या प्रश्नांची उत्तरे द्या एनपीआरच्या नको, जी ऐच्छिक आहेत. *

एनपीआर एप्रिल २०२० पासून सुरू होणार असल्याचे सूचित केले गेले आहे. *जनगणनेच्या आकडेवारी सोबत* एनपीआर डेटा संकलित केला जाईल तेव्हा त्यात २१ स्वतंत्र श्रेणींची माहिती मागितली जाणार आहे. नागरिकत्व नियमांच्या कलम ४(३) नुसार, "भारतीय नागरिकांची स्थानिक नोंदणी बनवण्याच्या व त्यामध्ये समावेश करण्याच्या उद्देशाने, लोकसंख्या नोंदणीमधील प्रत्येक कुटूंब आणि व्यक्तींकडून गोळा केलेल्या तपशिलांची स्थानिक निबंधकांद्वारे पडताळणी व छाननी केली जाईल."

लोकसंख्या नोंदणीची स्थानिक निबंधकांकडून पडताळणी व छाननी केली जाईल. पडताळणी प्रक्रियेदरम्यान, "अशा व्यक्ती" ज्यांचे नागरिकत्व शंकास्पद असेल त्यांचे तपशील स्थानिक निबंधकाने पुढील चौकशीसाठी लोकसंख्या नोंदणीमध्ये "शंकास्पद नागरिक" अशा योग्य त्या शेऱ्यासह नोंदवले पाहिजेत!

नागरिक नोंदणीच्या उपजिल्हा किंवा तालुका निबंधकांकडून प्रत्येक व्यक्तीला म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल. उपजिल्हा किंवा तालुका निबंधक नोंदणी केल्यानंतर ९० दिवसांच्या आत त्यांचा अंतिम निष्कर्ष ठरवतील. इतरांना तुम्ही किंवा तुमच्या कुटुंबाला किंवा इतर कोणालाही एनपीआर-एनआरसी यादीमध्ये समाविष्ट केल्याबद्दल "आक्षेप घेण्याचे" अधिकार दिलेले आहेत.

त्यानंतर कोणतेही "आक्षेप" मागवण्यासाठी ही आकडेवारी सार्वजनिक डोमेनमध्ये ठेवली जाते. निबंधकांचा आदेश अंतिम असतो: तुम्ही किंवा कोणत्याही व्यक्तीस राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीमधून वगळले आहे किंवा नाही याबाबत. एनपीआर हा अखिल भारतीय एनआरसीचा पहिला टप्पा आहे. किंवा एनपीआर म्हणजे एनआरसीमध्ये मागच्या दाराने प्रवेश करण्यासारखे आहे!

आणि हो, एनपीआर नोंदणी करण्याच्या आदेशाची राजपत्रित प्रत अधिकृत वेबसाइटवरून गहाळ आहे! असे का?

| ☑ **जनगणनेचे प्रश्न ज्यांची आपण उत्तरे दिलीच पाहिजेत:** | ☒ **एनपीआर अनुसूचीचे प्रश्न ज्यांची आपण उत्तरे देण्याची गरज नाही:** |
|---|---|
| **जनगणना घरांच्या यादीची अनुसूची:**<br>१. बिल्डिंग क्रमांक (महापालिका किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा जनगणना क्रमांक).<br>२. जनगणना घर क्रमांक.<br>३. जनगणना घराचा मजला, भिंत आणि छप्पर यांसाठी प्रमुख्याने वापरलेले साहित्य.<br>४. जनगणना घराचा वापर निश्चित करा.<br>५. जनगणना घराची स्थिती.<br>६. कुटुंब क्रमांक.<br>७. घरामध्ये सामान्यपणे राहणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या.<br>८. कुटुंब प्रमुखाचे नाव.<br>९. कुटुंब प्रमुखाचे लिंग.<br>१०. कुटुंबप्रमुख अनुसूचित जातीचा/अनुसूचित जमातीचा/इतर आहे का<br>११. जनगणना घराच्या मालकी हक्काची स्थिती.<br>१२. पूर्णपणे कुटुंबाच्या ताब्यात असलेल्या निवासी खोल्यांची संख्या. | एनपीआर अनुसूचीमधील बहुतांश रकाने आधीच भरलेले असतील कारण हा डेटा २०१० मध्ये या आधीच गोळा केला आहे आणि २०१५ मध्ये अपडेट केला आहे. त्यामुळे या डेटामधील बदलच केवळ नोंदवले जातील. अनुसुची/प्रश्नावलीमध्ये याआधीच भरलेला डेटा तुम्हाला सत्यापित करावा लागेल. गृह राज्यमंत्री (एमओएस) जी. किशन रेड्डी यांनी स्पष्ट केल्यानुसार एनपीआरच्या प्रश्नांची माहिती देणे ऐच्छिक आहे.<br>याचा अर्थ एनपीआरच्या अनुसूचीमध्ये विचारलेली माहिती देण्यास तुम्ही नकार देऊ शकता<br>जनगणना घर क्रमांक आणि कुटुंब क्रमांक<br>• सध्याचा पत्ता (पूर्व भरलेला)<br>• पिन कोड (पूर्व भरलेला)<br>• कुटुंबाची स्थिती (उपलब्ध / बंद / जागा बदलली / गणना करता आली नाही / नवीन)<br>• सदस्यांची संख्या (पूर्व भरलेले)<br>• व्यक्तीचे संपूर्ण नाव (पूर्व भरलेले)<br>• घरातील सदस्याची उपलब्धता<br>• कुटुंब प्रमुखाशी नाते |

१३. कुटुंबात राहणाऱ्या विवाहीत जोडप्यांची संख्या.

१४. पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत

१५. पिण्याच्या पाण्याच्या स्रोताची उपलब्धता.

१६. प्रकाश व्यवस्थेचा प्रमुख स्रोत.

१७. शौचालयाची उपलब्धता.

१८. शौचालयाचा प्रकार.

१९. सांडपाणी निस्सारण

२०. स्नानगृहाची उपलब्धता

२१. स्वयंपाक आणि एलपीजी/पीएनजी कनेक्शनची उपलब्धता.

२२. स्वयंपाकासाठी वापरले जाणारे मुख्य इंधन

२३. रेडिओ/ट्रांजिस्टर

२४. दूरदर्शन.

२५. इंटरनेटची उपलब्धता.

२६. लॅपटॉप / संगणक.

२७. दूरध्वनी / मोबाईल फोन / स्मार्टफोन.

२८. सायकल / स्कूटर / मोटरसायकल / मोपेड.

२९. कार / जीप / व्हॅन.

३०. घरात सेवन केले जाणारे मुख्य धान्य.

३१. मोबाइल क्रमांक (केवळ जनगणना संबंधित संपर्कासाठी).

* संदर्भ: ओआरजीआय राजपत्र अधिसूचना (घरांची यादी करण्याचा कालावधी आणि घरांच्या यादीसाठी व जनगणना २०२१ च्या घरांच्या गणतीसाठी प्रश्न) दिनांक ०७-०१-२०१९

• लिंग (पूर्व-भरलेले)

• वैवाहिक स्थिती

• जन्मतारीख (पूर्व भरलेले)

• जन्म ठिकाण (पूर्व भरलेले)

• घोषित केल्यानुसार राष्ट्रीयत्व (पूर्व भरलेले)

सूचना: नोंदविलेले राष्ट्रीयत्व हे प्रतिसादकर्त्याने घोषित केल्यानुसार असते. यामुळे भारतीय नागरिकत्वाचा कोणताही हक्क प्राप्त होत नाही

• पासपोर्ट क्रमांक (भारतीय असल्यासच ते पासपोर्ट क्रमांक विचारू शकतात)

सूचना पुस्तिकेत म्हटले आहे की, "**जर** प्रतिसादकर्त्याने पासपोर्ट क्रमांक प्रदान केला तर…" ज्याचा अर्थ असा घेतला जाऊ शकतो की मागितलेली माहिती ऐच्छिक आहे. याचा अर्थ तुमच्याकडे पासपोर्ट असला तरीही तुम्ही पासपोर्ट क्रमांक न सांगण्याचा पर्याय निवडू शकता.

• शैक्षणिक पात्रता

• व्यवसाय / कामकाज

• कायमचा रहिवासी पत्ता (पूर्व भरलेला)

• शेवटच्या निवासाचे ठिकाण आणि मुक्कामाचा कालावधी

**Q 12. Whether Staying at present place since birth**
**12 (a) Yes/No,**

| **if No, fill 12(b), else skip<br>12 (b) (i) Duration of stay at present place in years<br>12 (b) (ii) Place of Last residence** | |
|---|---|
| 12(a) | *Yes* |
| 12 (b) (i) | - |
| 12 (b) (ii) | - |
| State/Country | - |
| District | - |

| **Whether Staying at present place since birth<br>12(a) Yes/No,<br>if No, fill 12(b), else skip<br>12 (b) (i) Duration of stay at present place in years<br>12 (b) (ii) Place of Last residence** | |
|---|---|
| 12 (a) | *No* |
| 12 (b) (i) | *5* |
| 12 (b) (ii) | *Patna* |
| State/Country | *Bihar* |
| District | *Patna* |

• वडील, आई आणि जोडीदाराचा तपशील **(अनिवार्य नाही)**

| **Q.13(i) If father, mother and spouse are not enumerated in this household or not alive, write their names along with date of birth else write serial number** | **Q.13(ii) Place of Birth of Father & Mother**<br>If within India, write the name of the state and district if outside |
|---|---|

| | |
|---|---|
| | India, Write the name of the country and put '-' for district |
| Father's Name<br>*Ashok Kumar Bhardwaj*<br>(DOB as DD-MM-YYYY) | State/Country<br>*Uttar Pradesh*<br>District<br>*Banda* |
| *2 5 1 1 1 9 3 0* | |
| Mother's Name *0 4*<br><br>(DOB as DD-MM-YYYY) | State / Country<br>*Uttar Pradesh*<br>District<br>*Sitapur* |
| Spouse's Name<br>*Naina Bhardwaj* | |

• आधार क्रमांक (उपलब्ध असल्यास) (**स्पष्टपणे म्हटले आहे की "आधार क्रमांक रहिवाशांनी स्वेच्छेने प्रदान केल्यासच गोळा करावा."**)

• मोबाइल नंबर (पूर्व भरलेला)

• मतदार ओळखपत्र क्रमांक (उपलब्ध असल्यास)

• ड्रायव्हिंग परवाना क्रमांक (उपलब्ध असल्यास)

**जर वरीलपैकी कोणतेही आकडे उपलब्ध नसतील तर ती जागा रिक्त ठेवली जाऊ शकते. म्हणजेच, तुम्ही तुमची इच्छा असल्यासच ही माहिती प्रदान करू शकता.**

**तुमच्या माहितीसाठी:**

**जनगणना / एनपीआर डेटाचा सुद्धा गैरवापर केला जाऊ शकतो का?**

जनगणनेसाठी माहिती गोळा करण्यामागे अनेक सकारात्मक गोष्टी असल्या तरीही त्याला एक काळी बाजू सुद्धा आहे जिच्याकडे सहसा दुर्लक्ष केले जाते. जर्मनीने त्यांच्या जनगणनेच्या डेटाचा ज्यू लोकांना ओळखण्यासाठी गैरवापर करून नंतर त्यांचा छळ केला आणि जेव्हा त्यांनी युरोपवर आक्रमण केले तेव्हा त्यांनी तिथला लोकसंख्येचा डेटा मिळवून त्याचा विशिष्ट लोकांना ओळखून त्यांना एकत्र करण्यासाठी वापर केला आणि त्या लोकांना श्रम छावण्यांमध्ये डांबले आणि अखेरीस त्यांचा खात्मा केला.

अगदी अमेरिकेने सुद्धा लोकसंख्येच्या डेटाचा दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मूळच्या जपानी लोकांची माहिती मिळवण्यासाठी गैरवापर केला होता. युद्धाच्या काळात, अमेरिकेच्या पश्चिम किनारपट्टीच्या प्रदेशातील जपानी-अमेरिकन लोकांना एकत्र करून त्यांना छळ छावण्यांमध्ये पाठवण्यात आले होते.

**एनपीआर-एनआरसी धोकादायक का आहे**?

वरवर निरुपद्रवी वाटणारी प्रक्रिया असली तरी अखिल भारतीय एनआरसीची आखणी ही एनपीआरच्याच आधारावर केली जाईल असे अपेक्षित आहे. घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून झाल्यानंतर ज्यांचा यादीत समावेश झाला आहे अशी यादी जाहीर केली जाईल. ज्या लोकांची नावे एनपीआरमध्ये येणार नाहीत त्यांना त्याविरुद्ध अपील करावे लागेल आणि योग्य ती कागदपत्रे जिल्हा निबंधकाकडे सादर करावी लागतील, जो त्यानंतर निर्णय घेईल की संबंधित व्यक्ती नागरिक आहे किंवा नाही. तर मग हे 'सरकारी' अधिकारी जेव्हा आपल्या दारावर येतील तेव्हा ते कोणत्या कागदपत्रांची मागणी करतील? कोणत्या कागदपत्रांनी निबंधकाचे समाधान होईल?

जशी त्यांची कार्यशैली आहे, त्याला अनुसरून या सरकारने अद्याप हे स्पष्ट केलेले नाही की, घरोघरी जाऊन केल्या जाणाऱ्या या गणतीमध्ये कोणती कार्यपद्धती वापरली जाईल? कोणती कागदपत्रे मागितली जातील? कोणती कागदपत्रे चालतील आणि कोणती चालणार नाहीत? इतकी ही महत्त्वपूर्ण प्रक्रिया कशा प्रकारे राबविली जाईल? कोणते निकष वापरले जातील? एखादी व्यक्ती जन्माच्या आधारे नागरिकत्वासाठी पात्र ठरते किंवा नाही हे निश्चित करण्यासाठी "कट-ऑफ तारीख" कोणती असेल?

**भारतीय कोण आहे?**

केवळ काही कागदांचे तुकडे जवळ बाळगण्याने आपण भारतीय ठरतो का? एका विशिष्ट धर्मात जन्माला आल्याने आपण भारतीय ठरतो का? एका विशिष्ट राजकीय विचारसरणीवर विश्वास असला तरच आपण भारतीय ठरतो का? कोण भारतीय आहे हे कोण ठरवते?

जिथे दर काही मैलांवर भाषा रंग आणि चव बदलते, जिथे जगातील काही सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञानांचा उदय झाला आणि हजारो वर्षे त्यावर वादविवाद झाले अशी एक प्राचीन संस्कृती असल्याचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांसाठी या खरोखरच फार अरुंद व्याख्या आहेत. कोणतीही एकच संकल्पना ही भारताची संकल्पना असल्याचा दावा केला जाऊ शकत नाही. कोण भारतीय आहे आणि कोण नाही हे ठरवण्याची कोणतीही एक व्याख्या अस्तित्वात नाही.

नागरिकत्वाच्या चाचणीबाबत आमच्या एकूण मागण्या या आहेत:

1. नागरिकत्व दुरुस्ती कायदा २०१९ रद्द करावा किंवा त्यातील भेदभाव करणाऱ्या तरतुदी दुरुस्त करून सर्व शेजारील देशांमधून आलेल्या मुस्लिमांसह सर्व घटकांचा समावेश करावा
2. राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (एनपीआर) आणि अखिल भारतीय राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी/एनआरआयसी) च्या गणनेची प्रक्रिया त्वरित थांबवा.
3. नागरिकत्व (नागरिकांची नोंदणी व राष्ट्रीय ओळखपत्रे जारी करणे) नियम, २००३ रद्द करा/मागे घ्या
4. सर्व अटक छावण्या बंद करा
5. परदेशी नागरिक आदेश १९४८ मध्ये २०१५ आणि २०१७ मध्ये केलेल्या दुरुस्त्या रद्द करा/मागे घ्या
6. पासपोर्ट (भारतात प्रवेश नियम), १९५० मध्ये २०१५ आणि २०१७ साली केलेल्या दुरुस्त्या, ज्या भेदभाव करणाऱ्या आहेत आणि भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ आणि २१ चे उल्लंघन करणाऱ्या आहेत, त्या रद्द करा

आम्हाला आपले समर्थन पाठवा info@cjp.org.in वर किंवा आमच्याशी संपर्क साधा +९१ ७५०६६६११७१.

ट्विटर: @cjpindia
इन्स्टाग्राम: @cjpindia
फेसबुक: facebook.com/cjpindia